classmate

Date
Page

= गाठी भेटी =

आम्ही मैत्रीणी रोज संध्याकाळी कट्ट्यावर बसतो. गप्पागोष्टी करून घरी जाताना असे म्हणतो, "आम्ही वांग हिरवे देठ उद्या पुन्हा आपली भेट"!

त्यावरून मला भेटीगाठीवर काहीतरी लीहावे असे वाटले.

पुर्वीच्या काळी माणसांकडे फोन नव्हते, वाहने नव्हती तरी सुद्धा नातेवाईकांना मित्रमैत्रिणीना भेटण्याची ओढ असायची आणि कोणत्याना कोणत्या कारणाने एकमेकांकडे जाणे येणे असत. आणि भेटण्याचा आनंद घेत असत.

आता काळ बदलला आहे. काळा प्रमाणे माणसे पण बदलली आहेत. सगळ्या सुखसोई झाल्या आहेत. पण सगळीकडे इतकी चढाओढ असते. त्यामुळे माणूस बेजार होऊन जातो. शाळा, कॉलेज, नोकरीधंदा सर्व ठीकाणी स्पर्धा सुरू असते. माणसाला इतर काही करण्याचे मनात असुन सुद्धा जमत नाही. आता लहान मुलांपासुन मोठ्या माणसांपर्यंत प्रत्येकाकडे मोबाईल असतो. त्यामुळे मोबाईल वरच्या काम होतात. मित्रमैत्रिणी नातलग यांच्याशी गप्पा करता येतात. म्हणून प्रत्यक्ष जाऊन भेटावं अशी ओढ लागत नाही. तरी पण भेटी गाठी व नाते यांचे एक स्वर्गिय नाते असते. मात्र या नात्यातील धागे एकमेकांना घट्ट बांधलेले हवेत तर त्यात प्रेम, गोडवा रहातो. नाहीतर ही नाती क्षणीक ठरतात.

मात्र नात्यातील माणसांचे, मित्र मैत्रीणींचे, इतर सगे सोयरे यांचे संबंध जर एकमेकांशी घट्ट निगडीत असतील तर ती नाती नुसती प्रेमाची न रहाता ऋणानुबंधाची ठरतात.

ज्याच्याशी आपले असे नाते असते, तो माणूस कींवा ती व्यक्ती आपल्याला भेटली खूप आनंद होतो. प्रत्येक व्यक्ती तो आनंद हृदयामध्ये एका कोपऱ्यात कुठे तरी जपून ठेवते.

अशा ह्या नात्याच्या, मैत्रीच्या ऋणानुबंधाच्या गाठी भेटी आपल्याला अखेरच्या क्षणापर्यंत संकटात, आनंदात जीवन जगणे सुसह्य करतात.

श्रीमती सुनिता श्रीधर पटवर्धन
फोन नं. 9404413853